## L. A. BILL No. XXIV OF 2025.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.**

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २० मार्च २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

१९५८ चा ६५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.



एचबी ३०५४—१

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३ मध्ये,— १९५८ चा ६५.

(एक) पोट-कलम (१क) मधील, परंतुकातील, "रुपये २० लाखांपर्यंत" या मजकुराऐवजी, "रुपये तीस लाखांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (१ड) मधील, दुसऱ्या परंतुकातील, "रुपये २० लाखांपर्यंत" या मजकुराऐवजी, "रुपये तीस लाखांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) पोट-कलम (१फ) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(१ग) पोट-कलमे (१) व (१ई) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या क्रेन्स, क्रॉम्प्रेसर्स, प्रोजेक्टर्स किंवा खनित्रे यांसारख्या सर्व मोटार वाहनांवर आणि ओझे लादलेले असताना ज्याचे नोंदणीकृत वजन ७५०० किलोग्रॅमपेक्षा अधिक नसेल अशा माल किंवा सामग्री यांची राज्यामध्ये, वाहतुकीकरिता वापरल्या जाणाऱ्या हलक्या मालवाहू वाहनांवर, जर त्यांची महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, २०२५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर नोंदणी केलेली असेल तर, सहाव्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने, अशा वाहनांच्या हयातीकरिता एकाच वेळी द्यावयाचा कर आकारण्यात येईल व वसूल करण्यात येईल.". २००५ चा महा. .

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (२) मधील,—

(१) "किंवा (१ई)" या मजकुराऐवजी, ", (१ई) किंवा (१ग)" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (अ) मध्ये, "उपखंड (एक)" या मजकुरानंतर, "आणि (१ग)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (क) मध्ये, उपखंड (तीन) मधील, "किंवा, यथास्थिति, पोट-कलम (१फ)" या मजकुराऐवजी, ", (१फ) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (१ग)" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ याच्या तिसऱ्या अनुसूचीची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या तिसऱ्या अनुसूचीमध्ये, भाग एक मधील, स्तंभ (२) मध्ये,—

(१) नोंद (३) मधील,—

(क) उप-नोंद (अ) मधील, "वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के" या मजकुराऐवजी, "वाहनाच्या किंमतीच्या ८ टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) उप-नोंद (ब) मधील, "वाहनाच्या किंमतीच्या ८ टक्के" या मजकुराऐवजी, "वाहनाच्या किंमतीच्या ९ टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) उप-नोंद (क) मधील, "वाहनाच्या किंमतीच्या ९ टक्के" या मजकुराऐवजी, "वाहनाच्या किंमतीच्या १० टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) स्तंभ (२) मध्ये, नोंद (३) नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :—

"(४) बॅटरीवर चालणारे मोटार वाहन : जर वाहनाची किंमत ३० लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, वाहनाच्या किंमतीच्या ६ टक्के.".

**६.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या पाचव्या अनुसूचीनंतर, पुढील अनुसूची जादा दाखल करण्यात येईल :— सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ यात सहावी अनुसूची जादा दाखल करणे.

“**सहावी अनुसूची**

(कलम ३ (१ग) पहा)

| अ. क्र. | मोटार वाहनाचे वर्णन | नोंदणीच्या वेळेस एकाच वेळेस द्यावयाचा कर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | क्रेन्स, क्रॉम्प्रेसर्स, प्रोजेक्टर्स किंवा खनित्रे यांसारखी बांधकामाकरिता वापरली जाणारी कोणतीही मोटार वाहने. | मोटार वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के. |
| २. | ओझे लादलेले असताना, ज्याचे नोंदणीकृत वजन ७५०० किलोग्रॅमपेक्षा अधिक नसेल अशी माल किंवा सामग्री यांची वाहतुकीकरिता वापरली जाणारी हलकी मालवाहू वाहने. | मोटार वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के.”. |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.]**

**[ महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. प्रताप सरनाईक,**
परिवहन मंत्री.]

**[ विधानसभेने दिनांक २० मार्च २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २१ मार्च २०२५ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.